



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com






वर्ष २ रे | अंक : ६१८ . वा | सोमवार | दि. ०४ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# मतदारांना भुलवण्यासाठी कोठाळेंची पुन्हा खोटी आश्वासने...

# जिजाऊ बँकेचे भागधारक खोट्या आश्वासनांना भुलणार का?

## सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन चा पाठपुरावा अखेर जिजाऊ बँक अमरावती निवडणूक लागलीच.

**जनसंचलन/ बुलढाणा**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावती या संस्थेची निवडणूक ३१ डिसेंबर रोजी होत आहे. या निवडणुकीत विद्यमान अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे यांनी जिजाऊ सहकार पॅनल उभे केले आहे. या निवडणुकीत देखील कोठाळे व त्यांचे काही चेलेचपाटे मतदारांना भुलवण्यासाठी पुन्हा एकदा खोटी आश्वासने देताना दिसून येत आहेत. कमीत कमी जिजाऊ सहकार पॅनलच्या निवडणूक प्रचारपत्रातून तरी हे स्पष्टपणे दिसून येते. जिजाऊ बँकेचे अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे म्हणजे भ्रष्टाचाराचा व खोटारडेपणाचा मूर्तिमंत पुतळा आहेत. त्यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत बेबंद भ्रष्टाचार, प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार, हिटलरशाही कारभार केलेला आहे. आपला कारभार हाकताना त्यांनी कुठलीही शूचिता, कुठलाही अभिनिवेश बाळगला नाही. नैतिकता ही तर कोठाळेंच्या गावीच नाही. त्यांनी बँकेचा कारभार इतका बेदरकारपणे हाताळला की, तो बँकिंग क्षेत्रात कारभार कसा करू नये, याचा उत्तम नमुना ठरू शकतो. अशा स्थितीत दि. ३१ डिसेंबर रोजी आता बँकेची निवडणूक होऊ घातली आहे. पुन्हा एकदा स्वतःचा अध्यक्ष म्हणून राज्याभिषेक करण्याचा कोठाळेंचा आटापीटा सुरू आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने तर आजवर सातत्याने जिजाऊ बँकेत कोठाळे यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची इत्थंभूत माहिती वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु कोठाळे हे असे व्यक्तिमत्व आहे की,

**जिजाऊ कमर्शियल अमरावती बँकेचा प्रताप भाग-१९७**

ते समोरच्या व्यक्तीच्या नजरेला नजर भिडवून धादांत खोटे बोलतात. एव्हढेच नाही तर ऑन कॅमेरा आपल्या हजारो भागधारकांसमोर ते संपूर्ण खोटे चित्र उभे करतात. त्यामुळे या निवडणुकी तही ते खोट्याचाच प्रचार करणार, यात शंका नाही. याची एक चुणूक त्यांच्या प्रचारपत्रातून दिसून येते. अविनाश कोठाळे यांनी आपल्या प्रचारपत्रात बँकेसंबंधी बरीच आकडेवारी प्रकाशित केली आहे. खरेतर याचे त्रयस्थ संस्थेमार्फत पोस्टमॉर्टम होणे जरुरी आहे. आर्थिक व सहकार क्षेत्रातील तज्ञांनी यावर प्रामाणिकपणे आपले मत व्यक्त करणे गरजेचे आहे. परंतु या प्रचारपत्रातून हे स्पष्ट होते की कोठाळे हे पुन्हा एकदा मतदारांची धादांतपणे खोटे बोलून दिशाभूल करीत आहेत. बँकेचे एक अत्यंत मजबूत असे चित्र कोठाळे व त्यांचे चेलेचपाटे उभे करीत आहेत. मात्र, वस्तुस्थिती त्यापासून कोसो दूर आहे. भ्रष्टाचारी कोठाळे व त्यांच्या काही नालायक संचालकांनी आजवर बँकेत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. बँकेचा कारभार अत्यंत बेबंदपणे हाकला. बँकेत नियमबाह्य पद्धतीने कर्मचाऱ्यांची भर्ती केली. आपल्याच मर्जीतील कर्जदारांची ऐपत न पाहताच कर्जाचे वाटप केले. मर्जीतील लोकांची नियमबाह्य कर्जमाफी, व्याजमाफी केली. विविध पातळ्यांवर भ्रष्टाचार करून स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केले. अनेक खातेदारांच्या खात्यातून संचालकांच्या खात्यांमध्ये पैसे वळते करण्यात आले. बेकायदेशीरपणे एटीएम सुरू केले. बँकेच्या प्रोसिडिंग बुकात मोठ्या प्रमाणात हेरफेर केला. आपल्या मतदारांपर्यंत बँकेत सुरू असलेल्या अवैध व्यवहारांची माहिती पोहोचणार अशी व्यवस्था केली. जे मर्जीतील कर्जदार नाहीत त्यांच्याबाबत अत्यंत बेकायदेशीर कारवाया केल्या. शेगाव येथील पीडित यांच्या घरावर दिवसाढवळ्या दरोडा टाकला. त्यांच्या घरातील स्त्रीधन चोरून नेले. अधिकार नसतानाही बँकेचा कारभार हाकला. कोठाळे व त्यांच्या संचालकांच्या घोटाळ्यांबाबत सविस्तर लिहायचे म्हटले तर एखादे पुस्तकच लिहावे लागेल, अशी स्थिती आहे. हे सर्व घोटाळे सातत्याने दाबण्याचा प्रयत्न कोठाळे अ‍ॅण्ड गँगने आजवर सातत्याने काल. सहकार खात्यात व उपनिबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांशी साटेलोटे केले. एव्हढे करून देखील दैनिक जनसंचलनच्या दणक्याने कोठाळेंच्या पापांचा भंडाफोड झालाच. दैनिक जनसंचलनच्या रेट्यामुळे मग बँकेच्या चौकशाही लागल्या. चौकशीत कोठाळेंच्या कारभाराबाबत गंभीर ताशेरे ओढण्यात आलेले आहेत. किमान हा अहवाल बँकेच्या सामान्य मतदारांनी वाचला तरी कोठाळेंच्या घोटाळ्यांची त्यांना चांगली कल्पना येईल. कोठाळेंनी आजवर बँकेच्या कारभारात मनमानी केलेली आहेच. परंतु आता सर्व चाव्या या बँकेच्या मतदारांच्या हातामध्ये आहेत. कोठाळेंच्या




भ्रष्टाचाराची सद्दी संपवण्याची जबाबदारी आता मतदारांची आहे. त्यामुळे बँकेच्या मतदारांना आमचे आवाहन आहे की, बँकेत चाललेला भ्रष्टाचारी कारभार संपवायचा असेल तर कोठाळे व त्यांच्या चेल्याचपाट्यांना बँकेतून हाकलून लावणे गरजेचे आहे. कोठाळे व त्यांची लुटारू गँग ही निवडणूक जिंकण्यासाठी वाट्टेल ते करण्याची शक्यता आहे. त्यांना काहीही करून पुन्हा बँकेवर कब्जा करायचा आहेच. परंतु बहुजनांच्या हितासाठी स्थापन झालेली ही बँक वाचवायची असेल तर मतदारांनी सजग होऊन मतदान करणे गरजेचे आहे. असे झाल्यास बहुजनांची ही बँक वाचेल, अन्यथा कोठाळेंसारखे महाभ्रष्टाचारी या बँकेला डबघाईला आणल्याशिवाय राहणार नाहीत. शेवटी निर्णय हा सूज्ञ मतदारांनी घ्यावयाचा आहे

अजून बरेच काही पुढील भागात...

# ३० वर्षीय विवाहितेचा वाईट उद्देशाने हात धरुन केला विनयभंग...



**जनसंचलन/खामगाव**

महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनात दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येत आहे.या घटनांना कुठे तरी आळा बसणे गरजेचे आहे. वाईट उद्देशाने ३० वर्षीय विवाहितेचा हात धरून विनयभंग केल्याची घटना स्थानिक शंकर नगर भागात उघडकीस आली. याप्रकरणी विवाहितेच्या तक्रारीवरून ३२ वर्षीय युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक शंकर नगर भागातील ३० वर्षीय विवाहितेने शुक्रवारी शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली की, त्या सकाळी घरामागील बाथरूममध्ये आंघोळ करून घरात जात असतांना निलेश सुभाष हातेकर याने येऊन वाईट उद्देशाने हात धरला व तू माझ्याविरुद्ध पोलीस स्टेशनला रिपोर्ट का दिला, असे बोलून विवाहितेला तुझ्या मुलींना गायब करून परिवाराला जीवे मारून टाकेल अशी धमकी दिली. अशा तक्रारीवरुन खामगांव शहर पोलिसांनी निलेश हातेकर याच्याविरुद्ध कलम ३५४, ५०६ भादंवीनुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोहेकाँ मनोहर गोरे हे करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# त्या जखमी रोहिच्या पाडसाचा अखेर मृत्यू;. दोषींवर कार्यवाही करावी पण वनविभागाकडून कार्यवाहिस विलंब!

**जनसंचलन/ चिखली**

तालुक्यातील २१नोव्हेंबर रोजी रोहिच्या पाडसावर मोकाट कुत्र्यांनी हल्ला करून पाडसाला रक्तबंबाळ केले होते ही बाब बाजूला कापूस वेचणारे युवा शेतकरी यांच्या लक्षात येताच त्यांनी त्या पडसाला कुत्र्याच्या हल्ल्यातून वाचविले परंतु वनविभागाच्या कर्मचाऱ्याच्या हलगर्जीपणा मुळे पाच तास उशिराने उपचार मिळाल्यामुळे त्या पाडसाला अखेर आपल्या प्राणास मुकावे लागले.या घटनेला तब्बल बारा दिवस लोटूनही वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणतात कारणे दाखवा नोटीस दिले परंतु टाइम संपूनही वनरक्षक यांनी सदर नोटिसला उत्तर दिले नसल्याने वनविभागाच्या संवेदना मुक्या प्राण्या प्रति हरवल्याची भावना जनमानसात चर्चा सुरू आहे. २१नोव्हेंबर च्या दुपारी पाडळी शिंदे शिवारात रोही (नीलगाय)यांच्यापाडसावर कुत्र्यांनी हल्ला चढवला व पाडस रक्ताच्या थारोळ्यात पडलेले असतांना ही बाब बाजूला कापूस वेचणी शेतकऱ्याला कळताच त्यांनी सदर पडसाला कुत्र्याच्या तावडीतून वाचविले व ही बाब वनविभागाच्या वनरक्षक यांना ही माहिती देण्यासाठी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधला असता त्या महाशयांनी तब्बल दिवसा आपला फोन बंद करून ठेवला होता. त्यानंतर वनपाल रामलाल पवार यांना हि माहिती दिल्यानंतर संबंधित वनरक्षक हे चार तास विलंबाने आले व त्यानंतर पाचव्या तासाला त्या पाडसावर अंढेरा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात नेऊन उपचार करण्यात येऊन सदर पाडस वनविभागाच्या वनपरिक्षेत्र कार्यालय देऊळगाव राजा येथे नेण्यात आले व दुसऱ्या दिवशी उपचार करण्यात आले परंतु त्या पाडसाला विलंबच्या उपचाराने आपल्या प्राण गमवावे लागले.त्यानंतर दहा दिवसाचा कालावधी लोटून सुद्धा सदर पाडसाच्या उपचारासाठी उशिरा दाखल होणाऱ्या वनरक्षक यांच्या वर वनविभागाचे क्षेत्रीय अधिकारी यांनी करणे दाखवा नोटीस बजावली असल्याचे त्यांनी सांगितले व सात दिवसाचा अलटिमेंटम दिला होता परंतु सदर कालावधी लोटून वनरक्षक यांनी नोटीस दुर्लक्षित केल्याचे चक्रधर खेर्डे यांनी सांगितले यावरून असे दिसून येते की वनविभागाचे कर्मचारी आपल्या कर्तव्यप्रति किती वेळकाढू पणा करीत आहे.वनपरिक्षेत्र अधिकारी देऊळगाव राजा चक्रधर खेर्डे यांनी सदर दोषी असणाऱ्या वनरक्षक यांना कारणे दाखवा बजावली असून सात दिवसाचा अलटिमेंटम दिला होता कालावधी लोटल्यानंतर ही अद्याप संबंधित कर्मचाऱ्याने उत्तर दिले नसल्याचे सांगितले तर बुलढाणा विभागीय वनअधिकारी सरोज गवास यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की सदर प्रकरणाचा अहवाल मागितला असून अद्याप पर्यंत मात्र मिळाला नाही यावरून असे दिसते की सदर जखमी पाडसाच्या मृत्यूनंतर वनविभाग कर्मचारी बारा दिवसानंतर ही आपल्याच धुंदीत असून त्या निरागस पडसाला मात्र उशिराच्या उपचाराने आपल्या प्राणाला मुकावे लागले. तसेच वन्यजीव प्रेमी मात्र संबंधित विभागाच्या वेळकाढू पणावर मात्र नाराजी व्यक्त करीत असून त्या मृत पडसाच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या दोषींवर कार्यवाही करावी व निरागस पाडसाला न्याय मिळावा अशी मागणी वन्यजीव प्रेमी करीत आहे एवढे मात्र खरे!.



# भरधाव कारने स्कुटी व दुचाकीला उडविले; दोघे जखमी

**जनसंचलन/खामगाव**




भरधाव वेगातील कार चालकाने आधी एका स्कुटीला व नंतर एका दुचाकीला धडक दिल्याची घटना बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव रोडवरील विजयलक्ष्मी पेट्रोलपांसमोर घडली. या अपघातात एका मुलीसह दोघे जखमी झाले आहेत. खामगावकडून बुलढाणाकडे जाणाऱ्या कार क्र. एमएच १२एसक्यु ४४१८ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील कार भरधाव व निष्काळजीपणे चालवून आधी एका मुलीच्या स्कुटीला धडक दिली. त्यानंतर त्याने पुढे जावून आणखी एका दुचाकीला ठोस मारली. या अपघातानंतर सदर कारचालक घटनास्थळावरुन पळून गेला. या अपघातात कु. शिफा ही व दुसरा एक दुचाकी चालक जखमी झाला. तसेच या दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. याबाबत सदर मुलीचे वडील मो. आरीफ मो. शफी वय ५० रा. गोंधनापूर यांनी शिवाजीनगर पोस्टेला तक्रार दिली असून पोलिसांनी याप्रकरणी उपरोक्त कार चालकाविरुध्द कलम २७९, ३३७,४२७ भादंवी सहकलम १३४ मोवाकानुसार गुन्हा दाखल केला आहे.

# खामगावात भाजपचा जल्लोष फटाक्यांची प्रचंड आतिशबाजी



**जनसंचलन/खामगाव**

राजस्थान मध्यप्रदेश आणि छत्तीसगढ राज्यात विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या यशामुळे बुलढाणा जिल्ह्यातील खामगावात भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयासमोर कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी ढोल ताशाच्या निनादात जल्लोष केला. यावेळी फटाक्याची आतिशबाजी करण्यात आली. महिलांनी फुगडी खेळून आनंद व्यक्त केला. लोकांना पेढे वाटण्यात आले. यावेळी आमदार ॲड आकाश फुंडकर यांच्या भाजपचे नेत्यांसहअनेक पदाधिकारी या विजय उत्सवात सहभागी झाले होते.

# मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील येणार मलकापुरात सकल मराठा समाजासह शहरवासी स्वागतासाठी सज्ज...

**जनसंचलन/मलकापूर**



४ जानेवारी रोजी मलकापूर येथे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील हे येणार असून त्यांच्या स्वागतासाठी मलकापूर नगरी सज्ज झाली आहे. शहरात ठिकठिकाणी त्यांच्या स्वागताचे बॅनर व स्वागत कमानी उभारण्यात आल्या असून शहरात अनेक समाजाच्या वतीने स्वयंस्फुर्तीने त्यांच्या स्वागताचे बॅनर लावून आरक्षणासाठी समर्थन देण्यात येत आहे. या अंतर्गत महामार्गाने ते मुक्ताईनगर कडून मलकापूर शहरात प्रवेश करून सर्वप्रथम छत्रपती शिवाजी नगर येथील भवानी मातेचे पुजन, स्वराज्यनिर्माते छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे पुजन, या दरम्यान पंतनगर येथे त्यांचे स्वागत, तद्नंतर पंचायत समिती चौक, तहसील चौक, हनुमान चौक, पुन्हा तहसील चौक मार्गे यशवंत -नगर (सावजी फैल), रामवाडी, जाधववाडी, लक्ष्मीनगर आदी ठिकठिकाणी मराठायोध्दा मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत होणार असून लक्ष्मीनगर येथे जरांगे पाटील यांच्या या कार्यक्रमाची समाप्ती होणार असून ते याठिकाणी समाज बांधवांना मार्गदर्शन करतील. मराठा आरक्षणासाठी आरपारची लढाई लढत असलेल्या मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी सकल मराठा समाजासह मलकापूर शहरातील अनेक जण सज्ज झाले आहेत.

# वृध्देची पिशवी कापून ३० हजार रुपये चोरट्याने केले लंपास

**जनसंचलन/ चिखली**

७८ वर्षीय वृद्ध महिलेने बचत खात्यातून काढलेल्या रकमेतील अज्ञाताने पिशवी कापून ३० हजार रुपये लंपास केले सदर घटना भारतीय स्टेट बँकेच्या उदयनगर. (उंद्री) शाखेत १ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास घडली. याबाबत हकीकत असी की येथील श्रीमती जिजाबाई चोखाजी साळवे रा. उदयनगर यांनी अमडापुर पोलीस स्टेशनला फिर्याद दिली की माझा मुलगा सुभाष साळवे यांने मला २:३० वाजेच्या सुमारास स्टेट बँक शाखा उदयनगर येथे सोडले व तेथून निघून गेला नंतर मी माझे खात्यातून ४५ हजार रुपये काढले असता कॅशियरने १०० रुपयांच्या नोटांचे ४ बंडल व ५०० रुपयांच्या १० नोटा असे ४५ हजार रुपये दिले सदर पैसे मी माझे जवळ असलेल्या पिशवीत ठेवले व पासबुक नोंदी घेण्यासाठी लाईन मध्ये उभे राहले. नोंदी घेणे झाल्यानंतर मी माझ्या मुलाला मला घेण्यासाठी बँकेत बोलावले व त्याला पैसे देण्यासाठी पिशवीत हात घातला असता त्यातील अज्ञाताने पिशवी कापून त्यातील १०० रुपयांच्या नोटांचे ३ बंडल ३० हजार रुपये लंपास केल्याचे दिसून आले सदर घटना २:३० ते ३:१५ वाजेच्या दरम्यान घडली अशी फिर्याद अमडापुर पो.स्टे. ला दिल्यावरून अमडापुर पोलिसांनी अपराध क्र. ०३८१/ २०२३ कलम ३७९ नुसार दाखल केला असून पुढील तपास अमडापूर ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उदयनगर पोलीस चौकीचे सुमेरसिंग ठाकुर करीत आहेत.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तीन राज्यांतील विजय हा आगामी महाविजय-२०२४ ची नांदी - लोकसभा प्रमुख मा.आमदार विजयराज शिंदे...

जनसंचलन/बुलढाणा



राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा ,मध्य प्रदेश या चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल आज नुकतेच जाहीर झाले असून यामध्ये मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान तीन राज्यांत भाजपाने जबरदस्त बाजी मारली असुन स्वबळावर बहुमताने विजय मिळवून सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला आहे. या विजयाचा आज दि. ३ डिसेंबर २०२३ रोजी भाजपचे बुलढाणा लोकसभा प्रमुख मा.आमदार विजयराज शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालय शिवालय येथे जल्लोष करण्यात आला. भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व भारतीय जनता पक्षाचा जयघोष करत शिवालय परिसर दणाणून सोडला होता. तसेच भाजपा नेते विजयराज शिंदे व कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढा भरवून या विजयाबद्दल आनंद व्यक्त केला. यावेळी विजयराज शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या ङ्कतिन राज्यातील नागरिकांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वास ठेवून लोकमताचा स्पष्ट कौल भाजपला दिला आहे तिन्ही राज्यात स्वबळा भाजपा सत्ता स्थापन करणार आहे, त्यामुळे हा विजय म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील आगामी महाविजय-२०२४ च्या विजयाची नांदीच आहेङ्ख असे प्रतिपादन करत सर्व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते व मतदारांचे अभिनंदन व जाहीर आभार व्यक्त केले. यावेळी शिवालय येथे जल्लोष साजरा करण्यासाठी भाजपा प्रदेश प्रतिनिधी श्री दीपकदादा वारे, कामगार मोर्चा प्रदेश सचिव श्री विश्राम पवार, प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्री अण्णासाहेब पवार, प्रदेश सचिव सौ शालिनीताई बुंधे, जिल्हा उपाध्यक्ष श्री योगेश सावंत, शहराध्यक्ष श्री अनंता शिंदे,भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष श्री विनायक भाग्यवंत, कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष श्री दत्ता शिंदे, सौ स्मिताताई चेकेटकर, सौ सिंधुताई खेडेकर, महिला जिल्हा सरचिटणीस सौ उषाताई पवार,महिला जिल्हा उपाध्यक्ष सौ अलकाताई पाठक,ऍड किरणताई राठोड, कामगार मोर्चा तालुकाध्यक्ष श्री राजेंद्र पवार,कामगार मोर्चा शहराध्यक्ष रशीद शेख, उपाध्यक्ष श्री हाजीभाई, सरपंच अर्जुन दांडगे, अनिकेत गवळी, गणेश पांडे,प्रदीप तोटे, प्रकाश राजगुरे,यश तायडे, अशोक बाहेकर ,गजानन देशमुख ,नारायण देशमुख , अमोल जाधव,ऋषिकेश गोरे,सचिन सूर्यवंशी,किरण नाईक,यतीन पाठक यांसह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लेडी हेलन किलर जयंती निमीत्य जागतिक दिव्यांग दिन साजरा...




जनसंचलन/ खामगाव

खामगाव येथे दिव्यांग बांधवांच्यावतिने लेडी हेलन किलर च्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत दिव्यांग बांधवांना मिठाई वाटत आज ०३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन विराट मल्टीपर्पज फाऊंडेशन या दिव्यांग संस्थेच्या तसेच दिव्यांग शक्ती कार्यलय टॉवर चौक खामगाव येथे साजरा करण्यात आला यावेळी संस्था अध्यक्ष मनोज नगरनाईक यांच्यासह लोणार अपंग संस्थाध्यक्ष हे प्रमुख पाहुणे सिध्दार्थ अंभोरे ऊपस्थित होते दिव्यांग व दिव्यांगांच्या असलेला क्रिडा विषयात असलेल्या अडचणी वर मार्ग काढत दिव्यांग खेळाडुंसाठी खामगाव येथे १० डिसेंबर रविवार ला डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदान येथे नगरपरिषद खामगांव व विराट मल्टीपर्पज फाऊन्डेशन यांनी जिल्हास्तरिय पॅरॉ ऑलम्पिक स्पोर्स असोसिएशन बुलढाणा आयोजित राज्यातील पहिल्या दिव्यांग क्रिडा ज्यामध्ये गोळाफेक, भालाफेक,थालीफेक, कबड्डी १००मीटर धावणे तसेच तिन चाकी सायकल स्पर्धा मध्ये जास्तीत जास्त दिव्यांगांनी भाग ध्यावा हम भी कुछ कम नही हे दाखविण्यासाठी सर्व दिव्यांग अठरा वर्षाआतिल व पुढिल यांनी पुढे यावे असे संस्थेचे अध्यक्ष मनोज नगरनाईक यांनी विषद केले यावेळी प्रहार शहरअध्यक्ष क्षत्रुघन ईंगळे,दिव्यांग शक्ती व्यवस्थापक शेखर तायडे,मिलींप मधुपवार,कैलास चव्हाण,मो.रईस सुधाकर सातव,दिपक चिकाने,वसंत चीखलकर,दादा वैध,दिलीप गांधी,निरज सुराना,हर्षल खराबे,प्रीती सपकाळ,गजानन कुळकर्णी,भागवत ठोसर विलास खराबे गजानन सपकाळ,तानाजी तांगडे आदी यावेळी दिव्यांग हजर होते.

# अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या



जनसंचलन/ देऊळगावराजा

अवकाळी आलेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील कपाशी पिकाचे नुकसान झाल्याने चिंताग्रस्त झालेल्या शेतकऱ्याने शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना १ डिसेंबर रोजी तालुक्यातील दगडवाडी फाट्यावरील शेतात घडली. याबाबत सविस्तर असे की, आगेफळ तालुका लोणार येथील मुळचे रहिवासी मारुती सदावर्ते वय ७२ वर्षे हे कुटुंबियांसह ५० वर्षापासून दगडवाडी ता. देऊळगाव राजा येथे रहायला आले असून येथेच स्थायिक झाले आहे. त्यांच्या सासऱ्यांकडे दगडवाडी फाट्यावर कुटुंबियांची सामूहिक ५ एकर शेती असून त्यातील एक एकर शेती मारुती सदावर्ते यांना कसण्यासाठी दिली आहे. अनेक वर्षापासून ते ही शेती पेरतात. दरम्यान गेल्या ५ ते ६ दिवसांपासून अवकाळी पाऊस पडून परिसरात अतिवृष्टी झाली. यामध्ये सदावर्ते यांचे एक एकरातील कपाशी पीक जमिनदोस्त होवून नुकसान झाले. या चिंतेमुळे त्यांनी आत्महत्या केल्याचे त्यांचा मुलगा संतोष सदावर्ते यांनी सांगितले. मृतकाचे पश्चात पत्नी, २ मुले, २ मुली व बराच आप्त परिवार आहे.

# विविध रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्याने दहा एकरातील हरभरा पिकावर फिरवला रोटावेटर...

जनसंचलन/ चिखली



शेतकऱ्यांवरील संकट कमी होण्याऐवजी उलट वाढतांना दिसत आहे अस्मानी सह सुलतानी संघटने शेतकरी पुरता हताश होताना दिसत आहे अशातच खरीप पिक हातातून निघून गेल्यानंतर आता अवकाळी पाऊस आणि वातावरणात झालेल्या बदलामुळे रब्बी पिकावर देखील विविध रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने बुलढाणा जिल्ह्याच्या शेतकऱ्याने आपल्या दहा एकर हरभरा पिकावर रोटावेटर फिरवला आहे. बुलढाणा तालुक्यातील चिखला येथील हरिदास खांडेभराड यांच्याकडे १४ एकर जमीन आहे यामध्ये त्यांनी खरीपामध्ये सोयाबीनची पेरणी केली होती मात्र उत्पन्नात मोठी घट झाल्याने त्यांचा जमतील खर्च निघाला त्यामुळे त्यांना आता रब्बी पिकांवर मोठी आशा होते त्यामुळे त्यांनी आपल्या दहा एकर शेतात हरभरा पिकाची लागवड केली त्याला जवळपास पावणेदोन लाख रुपये खर्च आला मात्र अतिवृष्टी अवकाळी पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावर बुरशी द्द्या रोग आणि अळीचा प्रादुर्भाव झाल्याने त्यांचे उभे पीक जळत आहे आणि त्यामुळे या शेतकऱ्याने छातीवर दगड ठेवून या संपूर्ण दहा एकरातील हरभरा पिकात रोटावेटर घालून पीक उध्वस्त केले आहे.. हरिदास खांडेभराड यांच्यावर यांनी खरीप पेरणीसाठी विदर्भ क्षेत्रिय ग्रामीण बँकेचे साडेतीन लाख रुपये कर्ज घेतलेले आहे तर खाजगी पतसंस्थेचे देखील त्यांच्याकडे दोन लाख रुपयांचे कर्ज आहे आणि आता त्यांचा रब्बी पिका जवळपास पावणेदोन लाख रुपयांचा खर्च पाण्यात गेला आहे त्यामुळे आता बँकेचे कर्ज कसे द्यायचे या युवांचे नेत शेतकरी पडलाय हाताच्या फुलाप्रमाणे जपलेल्या पिकावर रोटावेटर चालवताना हे रोटावेटर पिकावर नव्हे तर आमच्या हृदयावर चालत असल्याच्या भावना यावेळी शेतकरी हरिदास खांडेभराड यांनी व्यक्त केले आहेत सोबतच शासनाने सरकारने शेतकऱ्यांना भरीव मदत करण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे.

# मोदींचा विश्वास ठरला सार्थक !...



## चार राज्यापैकी तीन राज्यात भाजपचे कमळ फुलले!

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

लोकसभेची सेमीफायनल मानल्या गेलेल्या पाचपैकी चार मोठ्या राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल रविवारी जाहीर झाले. या चारपैकी तीन राज्यांमध्ये भाजपने दणदणीत विजय मिळवत विरोधकांचे आवाहन लिलया परतावून लावले. राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसच्या हातातून सत्ता खेचून घेत भाजपने कमळ फुलवले, तर मध्य प्रदेशातही मोठ्या बहुमताने सत्ता राखली. या तीनही राज्यांमध्ये दुरंगी लढत होती. तळागाळापर्यंत राबवलेली प्रभावी प्रचार यंत्रणा, आश्वासन पूर्तीची मोदी गैरेटी, डबल इंजिनच्या सरकारचे लोकांना पटलेले फायदे, महिला व नवमतदारांना आपल्या बाजूला बळवण्यात आलेले दश, हे भाजपच्या यशाचे गमक आहे. ऐन लोकसभेच्या तोंडावर दोन राज्ये गमावणाऱ्या काँग्रेसला तेलंगणच्या जनतेने हात दिला, तर केंद्रीय राजकारणाचे स्वप्न बघणाऱ्या केसीआर यांना हा मोठा धक्का आहे.



राजस्थानातील विधानसभेच्या १९९,मध्यप्रदेशातील २३०, छत्तीसगडमधील ९० तर तेलंगणच्या ११९ जागांसाठी ही निवडणूक झाली. भाजपने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावावर ही निवडणूक लढवली आणि हिंदी भाषिक राज्यांमध्ये अद्यापही मोदींचा करिश्मा कायम असल्याचे निकालातून स्पष्ट झाले.




भाजपने मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच घेतलेली आघाडी भाजपने अखेरपर्यंत कायम ठेवली. मध्य प्रदेशात मुख्यमंत्री शिवराजसिंह सरकारच्या लाडली बहन सारख्या योजनांसह केंद्राच्या योजनांचे लाभ लोकांपर्यंत पोहोचवून सत्ताविरोधी लाटेचा फटका बसणार नाही, याची काळजी भाजपने घेतली. राजस्थानच्या जनतेने गत ३० वर्षांपासून दर पंचवार्षिक निवडणुकीत सत्तांतर केले आहे. सत्तांतराची ही परंपरा यंदाही कायम राहिली आहे.

## देशभर भाजप नेत्यांकडून विजयाचा जल्लोष तर मेहकर येथे पदाधिकारी कार्यकर्ते भिडले, दोन गटात तुफान हाणामारी

**जनसंचलन/मेहकर**

एकीकडे देशात आणि राज्यात भाजपचा विजयाचा आनंद साजरा करत असताना बुलढाणा जिल्ह्यात भाजपच्या दोन गटात हाणामारी झाली आहे. या घटनेमुळं जिल्ह्यातील भाजप अंतर्गत असणारे वाद चव्हाट्यावर आले आहेत. आज मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये भाजपाला मोठा विजय मिळाला. या विजयानंतर अनेक ठिकाणी भाजपकडून जल्लोष व्यक्त करण्यात आला. आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मात्र, बुलढाणा जिल्ह्यात मात्र एक वेगळं चित्र समोर आलं. दोन गटात तुफान हाणामारी झाली. त्यामुळे पुन्हा एकदा आजच्या दिवशी तरी हे टाळता आलं असतं का असं बोललं जात आहे. बुलढाणा जिल्ह्यातील भाजपच्या दोन गटात तुफान हाणामारी झाल्याच पाहायला मिळालं. भाजप कार्यालयात घुसून भाजप विधानसभा संपर्क प्रमुखास बेदम मारहाण करण्यात आली.बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे प्रकाश गवई



विधानसभा संपर्क प्रमुख यांच्या कार्यालयात पत्रकार परिषद सुरु होण्यापूर्वी हा प्रकार घडला. प्रल्हाद अन्ना लश्कर आणि शिव ठाकरे यांच्यासह २० ते २५ लोकांनी प्रकाश गवई आणि अर्जुन वानखेड़े, सारंग माळेकर यांच्यावर हल्ला चढवला. भाजपच्या या कार्यकर्त्यांनी भाजपच्याच पदाधिकाऱ्यांना बेदम मारहाण केली आहे. या कार्यकर्त्यांनी या पदाधिकाऱ्यांना नेमकी कशासाठी मारहाण ते स्पष्ट झालं नसल तरी मेहकर भाजपमधील अंतर्गत वाद या निमित्ताने चव्हाट्यावर आला आहे. दरम्यान, भाजपच्या कार्यालयात सुरु झालेला वाद रस्त्यावर देखील आला. भाजपमधील दोन गटातील वाद पाहण्यासाठी रस्त्यावर स्थानिक नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

## उधारीचे पैसे मागण्यास गेलेल्या मेस चालकास मारहाण



**जनसंचलन/खामगाव**

मेसच्या डब्यांचे बाकी असलेले पैसे मागण्यासाठी गेलेल्या मेस चालकासह त्याच्या भाच्याला तिघांनी मारहाण करून जखमी केल्याची घटना पारखेड येथे उघडकीस आली. गजानन गोपाल फरपट वय ४८ वर्षे रा. वाडी यांनी खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, पारखेड येथील रुपेश दत्ता राठोड, दत्ता राठोड, आणि राजू दत्ता राठोड यांच्याकडे मेसच्या डब्यांचे ३ हजार रुपये बाकी होते. सदर पैसे मागण्याकरिता गजानन फरपट व त्यांचा भाचा हे १ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता पारखेड येथे गेले असता उपरोक्त तिघांनी संगनमत करून त्यांना शिवीगाळ करत कपाळावर दगड मारून जखमी केले. तसेच बेदम मारहाण केली. यामध्ये गजानन फरपट व त्यांचा भाचा जखमी झाले. या तक्रारीवरून पोलिसांनी उपरोक्त तिघांविरुद्ध कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवीनुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकाँ देवराव धांडे हे करीत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याला वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

| 8x8 cm | 5x8 cm | 5x8 cm |
|---|---|---|
| 1 Month=5000/- | 1 Month=3500/- | 1 Month=3500/- |
| 15 Day=3500/- | 15 Day=2200/- | 15 Day=2200/- |
| 7 Day=2000/- | 7 Day=1500/- | 7 Day=1500/- |
| Hight 8 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 23 cm |

एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

**One Day**
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

| 2600/- | 1800/- | 1300/- |
|---|---|---|
| Hight 12 cm, Width 12 cm | Hight 8 cm, Width 10 cm | Hight 8 cm, Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:
अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com